तापमान
कमाल : - 32 अं. से.
किमान : - 25 अं. से.

आपली मुंबई

नवशक्ति

मुंबई, बुधवार, २७ ऑक्टोबर २०२१

मुंबई डायरी

टेम्पोच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

मुंबई : घाटकोपर मानखुर्द लिंक रोडवरून भरधाव वेगाने जात असलेल्या टेम्पोने मोटरसायकल धडक दिली. या धडकेत मोहम्मद युसूफ अब्दुल रजाक (३४) या दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. याप्रकरणी देवनार पोलीस ठाण्यात टेम्पो चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. मोहम्मद तबरेज शकील अहमद खान (३४) हा तरुण व्यवसायाने चालक आहे. तो चेंबूरच्या पी. एल. लोखंडे मार्ग परिसरात रहातो. शनिवारी रात्री साडेनऊच्या सुमारास मित्र मोहम्मद युसूफ याच्यासोबत दुचाकीवरुन ट्रॉम्बे येथील घरी जात होता.

महिलेच्या विनयभंगप्रकरणी तरुणाला अटक

मुंबई : महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी अंधेरी एमआयडीसी पोलिसांनी एका तरुणाला अटक केली. संजय गावडे असे या तरुणाचे नाव आहे. शुक्रवारी अंधेरीतील मालपा डोंगरी परिसरात एका महिलेची छेडछाड करून तिचा विनयभंग झाल्याचा संदेश कंट्रोल रुममधून एमआयडीसी पोलिसांना प्राप्त झाला होता. निर्भया पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. महिलेच्या तक्रारीवरून संजय गावडेला अटक केली आहे.

मुंबई युवा जनता दलातर्फे किल्ले स्पर्धा

मुंबई : युवा जनता दल (सेक्युलर) मुंबईतर्फे दिवाळीनिमित्त किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक स्पर्धकांनी आपल्या किल्ल्याचा व्हिडिओ आवश्यक माहितीसह गुरुवार ४ नोव्हेंबरपर्यंत पाठवणे आवश्यक आहे. सदर स्पर्धा मुंबई शहरापुरती मर्यादित असून किल्ला मातीचा बनवलेला असावा. व्हिडिओ मर्यादा ५ मिनिटे असेल. स्पर्धेतील सहभागींमधून तीन विजेते निवडून त्यांना आकर्षक सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल. इतर स्पर्धकांनाही प्रमाणपत्र दिले जाईल. स्पर्धकांनी नाव, पत्ता आणि संपर्क क्रमांक पाठवावा. यासाठी केतन कदम – ८६५७१९२७४२ यांच्याकडे संपर्क साधावा.

५ टक्के महागाई भत्त्याने एसटी कर्मचारी नाराज

आज राज्यभरात उपोषण; मूळ मागणीला केराची टोपली

प्रतिनिधी/**मुंबई**

ऐन दिवाळी उत्सवाचा तोंडावर एसटी कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्यात ५ टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय एसटी महामंडळाने जाहीर केला. मात्र, यामुळे केवळ ५०० रुपयांनी महागाई भत्ता वाढणार असून शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे २८ टक्के महागाई भत्ता मिळावा या कर्मचाऱ्यांचा मूळ मागणीला एसटी महामंडळाने केराची टोपली दाखवल्याचे पहायला मिळत आहे. दरम्यान, याबाबत कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. महागाई भत्त्यातील ५ टक्के वाढ म्हणजे आमच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार असून प्रशासनाने आम्हाला ठार मारायचेच ठरवले असल्याची संतप्त प्रतिक्रिया कर्मचाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. दरम्यान, विविध मागण्यांसाठी आज (ता.२७) रोजी राज्यातील सर्व विभागीय कार्यालयांवर एसटी कर्मचाऱ्यांकडून उपोषण करण्यात येणार आहे.

एसटी कर्मचाऱ्यांचा वेतनप्रश्न अद्याप मार्गी लागलेला नाही. वेतनाविषयी अनियमितता सुरू असतानाच दुसऱ्या बाजुला एस.टी. कर्मचाऱ्यांना कामगार करारान्वये मान्य केलेला १६ टक्के महागाई भत्ता, घरभाडे आणि गेल्या ३ वर्षांपासून रखडलेली वेतनवाढ या समस्यांचेही अद्याप निराकरण न झाल्याने कर्मचारी वर्गामध्ये एसटी महामंडळाविरोधात तीव्र असंतोष आहे. नुकतीच याबाबत शासन दरबारी बैठक पार पडली. सदर प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला होता. मात्र, अद्याप यावर तोडगा निघाला नसून उलट शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे २८ टक्के महागाई भत्ता द्यावा अशी मागणी असताना प्रशासनाने केवळ ५ टक्के महागाई भत्त्यात वाढ केली आहे. दरम्यान, यामुळे एकूण अडीच हजार रुपये एवढा भत्ता कर्मचाऱ्यांच्या हातात पडणार असून यंदाची दिवाळीही कर्मचाऱ्यांसाठी कडवट ठरणार आहे.

मागण्यांबाबत शासन गंभीर नाही

जुलै–ऑगस्ट महिन्यातील वेतनासाठी शासनाकडून ५०० कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला होता. मात्र, सप्टेंबरच्या वेतनासाठी पुन्हा कर्मचाऱ्यांना शासनाचे दार ठोठवावे लागले. यादरम्यान, अनेक कर्मचाऱ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले. मात्र वेतनप्रश्न अद्याप सुटलेला नसून शासन दरबारी देखील याबाबत फारसे गांभीर्य नसल्याचे दिसते. तसेच, एसटीचे शासनामध्ये विलनीकरण करण्यात यावे या मागणीकडेही कानाडोळा करण्यात येत आहे. याविरोधात आज राज्यभरात उपोषण करण्यात येणार असून जोपर्यंत मागण्या मान्य होणार नाही, तोपर्यंत लढा सुरूच राहणार असल्याचे कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे.

एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी ११२ कोटी

प्रतिनिधी/मुंबई : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची आर्थिक स्थिती सावरण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी महाविकासआघाडी सरकारकडून विविध उपाययोजना राबविल्या जात असून नुकतेच एसटी कर्मचाऱ्यांचा वेतनप्रश्न मार्गी लावण्यासाठी महत्वाचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला आहे. दरम्यान, कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन देण्यासाठी विशेष बाब म्हणून ११२ कोटींचा निधी तातडीने वितरीत करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी (ता.२६) रोजी दिले असून त्यानुसार आज तातडीने निधी वितरीत करण्यात आला आहे. यामुळे राज्यातील हजारो एस.टी. कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार आहे.

कोरोना संकट काळात एस.टी. कर्मचाऱ्यांनी उत्तम सेवा बजावली आहे. या सर्व कर्मचाऱ्यांच्या पाठीशी महाविकास आघाडी सरकार ठामपणे उभे आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर असणाऱ्या परिवहन महामंडळाच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. कोणत्याही कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत झाले पाहिजे अशी या सरकारची भूमिका आहे. कोरोना संकटकाळात टाळेबंदीची परिस्थिती निर्माण झाल्याने एस.टी.च्या वाहतुकीवर परिणाम झाला. प्रवासी संख्या कमी झाली. त्यामुळे परिवहन महामंडळाला आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. परिणामी पगारासाठी निधीची कमतरता निर्माण झाली. या कठीण परिस्थितीचा विचार करता परिवहन महामंडळाला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ११२ कोटींचा निधी तातडीने वितरीत करण्याचे निर्देश दिले व त्याची तात्काळ अंमलबजावणी झाली आहे.

आयडॉलचे पदवी–पदव्युत्तर प्रथम वर्षाचे प्रवेश सुरू

प्रतिनिधी/मुंबई : मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या १७ अभ्यासक्रमास युजीसी–डीईबीने शैक्षणिक वर्ष २०२१–२२ च्या प्रवेशासाठी नुकतीच मान्यता दिली आहे. यानुसार आयडॉलच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाचे प्रवेश आजपासून (२७ नोव्हेंबर २०२१) पासून सुरू होत आहेत. मागील वर्षी कोविडची साथ असतानाही आयडॉलमध्ये १५ अभ्यासक्रमांमध्ये ६४ हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. आयडॉलमध्ये यूजीसीच्या निर्देशानुसार सीबीसीएस सत्र पद्धत सुरू करण्यात करण्यात आलेली आहे. पदवी स्तरावरील प्रथम वर्ष बीए, बीकॉम, बीएस्सी आयटी,बीएस्सी कॉम्प्युटर सायन्स हे अभ्यासक्रम, पदव्युत्तर स्तरावरील प्रथम वर्ष एमए (इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल, मराठी,हिंदी, इंग्रजी), एमए शिक्षणशास्त्र, एमकॉम, एमएस्सी आयटी या अभ्यासक्रमाचे प्रवेश आजपासून सुरू होत असून प्रवेश अर्ज भरण्याची शेवटची तारीख २० नोव्हेंबर २०२१ आहे.

मुंबईतील १० हजार सोसायट्यांचे १०० टक्के लसीकरण

२२ हजार सोसाट्यांमध्ये विशेष मोहीम राबविणार : सुरेश काकाणी

प्रतिनिधी / **मुंबई**

कोरोनावर उपयुक्त लस उपलब्ध झाल्यानंतर लसीकरण मोहीमेला वेग देण्यात येत आहे. मुंबईतील ३७ हजार सोसायट्यांपैकी १० हजार सोसायट्यांचे संपूर्ण लसीकरण पूर्ण झाले आहे. मुंबईतील ३७ हजार सोसायट्यांपैकी २२ हजार सोसायट्यांमधील रहिवाशांचे लसीकरण करण्यासाठी विशेष लसीकरण मोहीम राबवण्यात येत असल्याचे मुंबई पालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुरेश काकाणी यांनी सांगितले. दरम्यान, लसीकरण पूर्ण झाल्यानंतर दर्शनी भागात 'माझी सोसायटी, जबाबदार सोसायटी' या संदेशासह आकर्षक आणि अभिमानास्पद ढाल असणारी भित्तीपत्रके लावण्यात येत असल्याचे ते म्हणाले.

मुंबईत १६ जानेवारीपासून लसीकरण सुरू करण्यात आले. यामध्ये २५ ऑक्टोबरपर्यंत एकूण १ कोटी ३८ लाख ७७ हजार ८२३ डोस देण्यात आले आहेत. १८ वर्षांवरील पात्र ९० लाख लाभार्थ्यांपैकी ८७ लाख ४४ हजार ९८२ जणांनी पहिला डोस, तर ५१ लाख ३२ हजार ८४१ जणांनी दुसरा डोसही घेतला आहे. पालिकेच्या लसीकरणाचा वेग वाढविण्यासाठी सद्यस्थितीत पालिका, सरकारी आणि खासगी मिळून

४६८ लसीकरण केंद्रे सुरू आहेत. दरम्यान, लसीकरण पूर्ण करणाऱ्या सोसायट्यांना प्रोत्साहन देण्यासाठी दर्शनी भागात 'माझी सोसायटी, जबाबदार सोसायटी' असा बोर्ड लावण्याचा उपक्रम पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत आहे. यानुसार आतापर्यंत दहा हजार सोसायट्यांनी लसीकरण पूर्ण केल्याने त्या सोसायट्यांवर फुल्ली व्हॅक्सिनेशन असा फलक लावण्यात आल्याचे काकाणी यांनी सांगितले.

अशी राबवली जाते मोहीम!

महापालिका क्षेत्रातील नागरिकांचे लसीकरण वेगाने व्हावे आणि लसीकरणासाठी सोसायट्यांना प्रोत्साहन मिळावे याकरिता 'माझी सोसायटी, जबाबदार सोसायटी' आणि My Society, Responsible Society असा संदेश असलेली मराठी व इंग्रजी भाषेतील भित्तीपत्रके प्रकाशित करण्यात आली आहेत. ही भित्तीपत्रके पालिकेच्या सर्व २४ विभागांमधील लसीकरण पूर्ण करणाऱ्या सोसायट्यांच्या दर्शनी भागात लावण्याची कार्यवाही सहायक आयुक्तांच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

Bank of Baroda

एफआय डिपार्टमेंट, बँक ऑफ बडोदा, मुंबई पूर्व विभाग,
१ ला मजला, ए विंग, देवमूर्ती बिल्डिंग, स्टेशन रोड,
भांडुप पश्चिम, मुंबई – ४०००७८

कंत्राट तत्वावर बिझनेस करस्पॉडंट सुपरवायजरची नियुक्ती

बँक ऑफ बडोदा मुंबई महानगर पूर्व विभाग, मुंबई साठी कंत्राट तत्वावर **बिझनेस करस्पॉडंट सुपरवायजर** च्या नियुक्तीसाठी इच्छुक उमेदवाराकडून ऑफलाईन अर्ज मागवत आहे.

पात्रता :

१) कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेतील ग्रामिण बँकिंग मधील किमान ३ वर्षांचा अनुभव असलेले माजी बँकर, नियुक्तीच्या वेळी कमाल वय ६४ वर्षांपेक्षा जास्त नसावे.
किंवा
२) २१ ते ४५ वर्षे वयोगटातील चांगले संगणक ज्ञान असणारे किमान पदवीधर अर्हता असलेले तरुण उमेदवार.

पदाचे नाव	कंत्राट तत्वावर बीसी सुपरवायजर
पदांची संख्या	एकूण – १२
कंत्राट कालावधी	१२ महिने (अटी व शर्तींच्या अधीन राहून त्यानंतर दर ६ महिन्यांनी नूतनीकरण योग्य)
मासिक परिश्रमिक	रु. १५,०००/- + रु. १०,०००/- पर्यंत व्हेरिबेजल कंपोनंट
अर्ज सादर करण्यासाठी अंतिम तारीख	३ नोव्हेंबर, २०२१

कोणत्याही चौकशीसाठी fi.mmer@bankofbaroda.co.in वर संपर्क साधावा.
संपर्क क्र. : ०२२-६८४१२५१२

दिनांक : २६.१०.२०२१ — विभागीय व्यवस्थापक

SBI

नोंदणीकृत कार्यालय: कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०००२१

सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की ६ नोव्हेंबर, २०१८ दिनांकित सेबी परिपत्रक क्र. SEBI/HO/MIRSD/DOS3/CIR/P/२०१८/१३९ च्या अनुषंगाने, ९८, रास विहार आयपी एक्स्टेंशन, दिल्ली–११००९२ येथील निवासी राज कुमार शर्मा यांचेकडून खाली दिलेल्या तपशिलांनुसार प्रतिभूती धारकाच्या/ धारकांच्या नावे धारण असलेल्या खाली नमूद केलेल्या प्रतिभूती त्यांच्या नावे हस्तांतरित करण्याची विनंती बँकेला प्राप्त झाली आहे. या प्रतिभूती त्यांच्याद्वारे खरेदी केल्या असल्याचा दावा आहे आणि त्यांच्या नावे हस्तांतरित झालेल्या नाहीत.

उपरोल्लेखित प्रतिभूतींसंदर्भात दावा असणारी कोणत्याही व्यक्ती/ संस्थेने आपला अशा प्रकारचा दावा बँकेचे रजिस्ट्रार व ट्रान्स्फर एजंट (आरटीए) अलंकित असाईनमेंट्स लिमिटेड, २०५–२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालन एक्स्टेंशन, नवी दिल्ली – ११००५५ (इमेल आयडी: sbi.igr@alankit.com) यांचेकडे या तारखेपासून ३० दिवसांच्या आत आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ योग्य कागदोपत्री पुराव्यांसह सादर करावा, अन्यथा कोणत्याही पुढील सूचनेशिवाय बँक सदर प्रतिभूती राज कुमार शर्मा (प्रस्तावित हस्तांतरितीची /हस्तांतरितींची नावे) यांच्या नावे हस्तांतरित करण्याच्या कार्यवाहीस सुरुवात करेल.

अनु क्र.	फोलिओ क्रमांक	हस्तांतरणकर्त्याचे नाव	हस्तांतरितीचे नाव	समभाग संख्या	प्रमाणपत्र क्रमांक	विभिन्न क्रमांक	
						पासून	पर्यंत
१	०२६०७१०५	फ्लेंगशिप ट्रेडिंग कंपनी	राज कुमार शर्मा	५०	७७०३९२६	३३६५०४९५१	३३६५०५०००
				(५००)*	१४९४४	७३७४९१३६४१	७३७४९१४१४०
२	०२६६६८६५	बी आर वाधवा चंद रानी	राज कुमार शर्मा	५०	७७६६००४	३३९६४८८५१	३३९६४८९००
				(५००)*	११३८२	७३७५१२७०४१	७३७५१२७५४०
३	०१७०७५३७	अमिता अनिल वाझिरानी मालती भगवानदास वाझिरानी	राज कुमार शर्मा	५०	७७९१७१	२९०३०७२०१	२९०३०७२५०
				(५००)*	९८६४	७३७२४३२२५१	७३७२४३२७५०
४	०११३२०१८	राज कुमार श्याम कुमार जीवानी	राज कुमार शर्मा	--	--	--	--
				(५००)*	११८१२५	७४०५३४०४६१	७४०५३४०९६०

* कंसातील आकडे रु. १ दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवितात.

स्थळ: मुंबई — **महाव्यवस्थापक (शेअर्स व बॉण्ड्स)**
दिनांक: २७.१०.२०२१

भारतीय बनावटीचे साहित्य तेजीत

यंदाच्या दिवाळीत चिनी साहित्य हद्दपार

प्रतिनिधी/**मुंबई**

प्रकाशाचा उत्सव असलेला दीपावली सण अवघ्या काही दिवसांवर आला आहे. त्यानिमित्त बाजारात आकाशकंदील, रांगोळ्या, लक्ष्मीदेवीच्या मूर्ती, पणत्या खरेदीसाठी गर्दी होऊ लागली आहे. मात्र, नागरिकांकडून यंदा चिनी मातीच्या साहित्याऐवजी भारतीय बनावटीच्या साहित्यांना सर्वाधिक मागणी असल्याचे दिसून येत आहे.

गतवर्षी कोरोना प्रादूर्भाव असल्याने साधेपणाने आणि अल्प खर्चात सर्वच कुटुंबांमध्ये दिवाळी सण साजरा करण्यात आला होता. मात्र, सद्यस्थितीत कोरोना आटोक्यात आला असताना मिळालेल्या शिथिलतेचा फायदा घेत नागरिकांनी दिवाळीच्या खरेदीसाठी गेल्या दोन दिवसांपासून बाजारपेठांमध्ये गर्दी केली आहे. यासाठी विविध वस्तू बाजारात दाखल झाल्या असून यामध्ये गतवर्षीच्या तुलनेत ६० टक्के चिनी साहित्याकडे ग्राहकांनी पाठ फिरवल्याचे चित्र आहे. दरम्यान, प्लास्टिकबंदी आणि चिनी साहित्यावर सर्व व्यापाऱ्यांसह ग्राहकांनी बहिष्कार टाकल्याने बाजारात भारतीय बनावटीच्या साहित्याला मोठी मागणी सुरू झाली आहे. यामध्ये महिला बचत गटांमार्फत बनवण्यात आलेले पणत्या, आईस्क्रीमच्या काड्या–बांबू, कागदापासून तयार केलेले पर्यावरणपूरक आकाशकंदील, भारतीय धाटणीचा विविध रंगी तोरणमाळा आदी सजावटीच्या सामानांचा समावेश आहे.

१५० रूपयांपासून ते ३ हजारांपर्यंत कंदील

गणेशोत्सवात कोल्हापुरी विणकाम, नक्षीकाम केलेले मखर दाखल झाले होते. त्याचप्रमाणे आता कापडी कंदीलही उपलब्ध आहेत. कापडावर नक्षीकाम, विणकाम करून हे कंदील बनविण्यात आले आहेत. हे कंदील कोल्हापूरहून मोठ्या प्रमाणावर दाखल झाल्याची माहिती क्रॉफर्ड मार्केटमधील विक्रेत्यांनी दिली. कापडी विणकाम केलेले विविध आकाराचे कंदील २०० ते ३००० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. तर, कागदापासून बनविलेले कंदील १५० ते ७०० रुपयांपर्यंत आणि आइस्क्रीमचा काड्यांपासून तयार केलेले कंदील १५०–५०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत.

INDIA ELECTRIFIED! WITH AMPERE

1,00,000 EVs.* SOLD IN 400+ TOWNS.

* Inclusive of e2W & e3W

GREAVES

ENGINES | RETAIL | ELECTRIC MOBILITY

३० सप्टेंबर, २०२१ रोजी संपलेल्या तिमाही आणि सहामाहीसाठी अलेखापरीक्षित स्वतंत्र आणि एकत्रित वित्तीय निकालांचे संक्षिप्त विवरण

(₹ कोटीत)

अनु. क्र.	तपशील	स्वतंत्र					एकत्रित				
		रोजी संपलेले तिमाही		रोजी संपलेली सहामाही		रोजी संपलेले वर्ष	रोजी संपलेले तिमाही		रोजी संपलेली सहामाही		रोजी संपलेले वर्ष
		३०.०९.२०२१	३०.०९.२०२०	३०.०९.२०२१	३०.०९.२०२०	३१.०३.२०२१	३०.०९.२०२१	३०.०९.२०२०	३०.०९.२०२१	३०.०९.२०२०	३१.०३.२०२१
		अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	अलेखापरीक्षित	लेखापरीक्षित
१.	कामकाजातून मिळालेले एकूण उत्पन्न	२९१.६०	२८९.९८	५१०.४१	४३९.२३	१,३३९.१०	३७९.६५	३३०.९९	६११.७७	४८९.२२	१,५०८.७३
२.	कालावधीसाठीचा निव्वळ नफा/(तोटा) (कर व अपवादात्मक बाबींपूर्वी)	०.६६	४.१९	(१२.१९)	(२८.६२)	५२.९३	(२०.२१)	(०.१४)	(४९.४५)	(४०.९४)	२०.६७
३.	कालावधीसाठीचा निव्वळ नफा/(तोटा) करपूर्व (अपवादात्मक बाबींनंतर)	११.३४	(२६.१८)	२.५२	(५९.७१)	१८.४७	(१८.९८)	(३१.२३)	(४४.१९)	(७२.०३)	(१३.७१)
४.	कालावधीसाठीचा निव्वळ नफा/(तोटा) करपश्चात (अपवादात्मक बाबींनंतर)	८.३४	(१८.०३)	१.८७	(४२.२३)	१०.३६	(२३.२९)	(२२.४९)	(४५.७७)	(५३.३५)	(१८.७८)
५.	कालावधीसाठीचे एकूण सर्वांगीण उत्पन्न (ज्यात या कालावधीसाठीचा नफा/(तोटा) (करपश्चात) आणि इतर सर्वांगीण उत्पन्न (करपश्चात) समाविष्ट आहे	८.५१	(१८.१५)	२.२८	(४२.०२)	११.३३	(२३.११)	(२२.६१)	(४५.३५)	(५३.१४)	(१७.८०)
६.	समभाग भांडवल	४६.२४	४६.२४	४६.२४	४६.२४	४६.२४	४६.२४	४६.२४	४६.२४	४६.२४	४६.२४
७.	इतर समभाग					८५४.७१					७३६.२७
८.	प्रति भाग उत्पन्न (₹)										
	– मुलभूत	०.३६	(०.७८)	०.०८	(१.८३)	०.४५	(१.०१)	(०.९७)	(१.९८)	(२.३१)	(०.८१)
	– सौमीकृत	०.३६	(०.७८)	०.०८	(१.८३)	०.४५	(१.०१)	(०.९७)	(१.९८)	(२.३१)	(०.८१)

टीप:

१. वर दिलेल्या माहिती सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन ३३ खाली स्टॉक एक्स्चेंजेस्कडे सादर केलेल्या तिमाही आर्थिक निकालांच्या सविस्तर अहवालाचा सारांश आहे. तिमाही आर्थिक निकाल पूर्ण स्वरूपात स्टॉक एक्स्चेंजच्या वेबसाइटवर म्हणजेच www.bseindia.com आणि www.nseindia.com येथे उपलब्ध आहेत. ते कंपनीच्या वेबसाइटवर www.greavescotton.com येथेही उपलब्ध आहेत.

ग्रीव्ज् कॉटन लिमिटेडसाठी
अजित वेंकटरमन
कार्यकारी संचालक
(डीआयएन: ०७२८९९५०)

ठिकाण : मुंबई
दिनांक : २६ ऑक्टोबर, २०२१

७,०००+ आफ्टरमार्केट नेटवर्क । ५००+ रिटेल सेवा केंद्र । १६२ वर्ष

GREAVES SINCE 1859

ग्रीव्हज कॉटन लिमिटेड

कॉर्पोरेट आयडेन्टीटी नंबर: एल९९९९९एमएच१९२२पीएलसी०००९८७
नोंदणीकृत कार्यालय: युनिट क्र. ७०१, ७वा मजला, टॉवर ३, इक्विनॉक्स बिझिनेस पार्क, एलबीएस मार्ग, कुर्ला (प.) मुंबई – ४०० ०७०.
दूरध्वनी: +९१-२२ ४१७११७००
ईमेल: investorservices@greavescotton.com
वेबसाइट: www.greavescotton.com

AutoEVmart - a multi - brand EV retail platform